# <u>बाल गीत</u>

बागुलबुवा बागुलबुवा ये ना
माझ्याबरोबर खेळ ना...

माझ्यापेक्षा मोठे आहे दप्तर माझे
पुस्तका सोबत त्यात मी ही मावीन
शाळेचे दप्तर घे ना
बागुलबुवा बागुलबुवा ये ना ...

एकदा तरी ट्रेनची वीज घालवून दे
आई बाबांना सुट्टी मिळू दे
दिवसाचे जेवण सोबत खाऊ दे
बागुलबुवा बागुलबुवा ये ना ...

देव कसा आहे जरा दाखव ना
एकदा तरी मला त्याला भेटव ना
दगडाबाहेर त्याला आमच्यात आण
बागुलबुवा बागुलबुवा ये ना ...